**ठळक बातम्या**

- भारताची उर्जा क्षेत्रातली गुंतवणूक यंदा १७० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतक्या विक्रमी पातळीवर पोहोचण्याचा अंदाज

- सीबीएसईच्या बारावीच्या पूर्ण परीक्षेचं पुनर्मूल्यांकन करण्याची केंद्रीय शिक्षण मंत्र्यांची घोषणा

- चीनला मागे टाकून भारत बनला जगातला सर्वात मोठा तांदूळ उत्पादक देश

- कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आज राजीनामा देणार

**आणि**

- सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पी. व्ही सिंधूचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><>**

भारताची उर्जा क्षेत्रातली गुंतवणूक यंदा १७० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतक्या विक्रमी पातळीवर पोहोचण्याचा अंदाज आंतरराष्ट्रीय उर्जा संस्थेच्या वर्ल्ड एनर्जी इन्व्हेस्टमेंट या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. भारताने आपली वाढत्या उर्जेची मागणी पूर्ण करण्यासाठी पायाभूत सुविधा बळकट करण्याचा आणि स्वच्छ उर्जेकडे संक्रमणासाठीच्या प्रयत्नांचा वेग वाढवला आहे. त्यामुळे गेल्या पाच वर्षांत भारतातल्या उर्जा गुंतवणुकीत सरासरी वार्षिक ११ टक्के दराने वाढ झाल्याचं अहवालात म्हटलं आहे. या काळात सौर उर्जेच्या गुंतवणुकीत २५ टक्के वार्षिक दराने तर तेल शुद्धिकरण क्षेत्रातली गुंतवणूक २३ टक्के दराने वाढली आहे. कोळसा पुरवठा क्षेत्रात गुंतवणूक करणारा भारत हा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे आणि गेल्या दशकात या क्षेत्रातली गुंतवणूक तिप्पट झाल्याचंही या अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

सीबीएसईच्या बारावीच्या परीक्षेच्या मूल्यमापन प्रक्रियेबाबत काही त्रुटी निदर्शनाला आल्यामुळे आता पुनर्मूल्यांकन प्रक्रिया सुरू केली जाईल, अशी माहिती केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिली. ते आज नवी दिल्लीत सीबीएसईच्या अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलत होते. सर्व विद्यार्थ्यांच्या शंकांचं निरसन केलं जाईल. तसंच

मूल्यमापनातल्या विसंगती संदर्भातल्या समस्यांचं निराकरण केलं जाईल आणि त्यावर उपाययोजनाही केल्या जातील, असं प्रधान यावेळी म्हणाले.

**होल्ड.. बाईट - धर्मेंद्र प्रधान**

**<><><><><>**

तांदूळ उत्पादनात चीनला मागे टाकून भारत सर्वात मोठा तांदूळ उत्पादक देश ठरल्याचं प्रतिपादन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं. ते आज नवी दिल्लीत खरीप अभियान 2026 या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभाला संबोधित करत होते. देशातल्या कष्टाळू शेतकऱ्यांच्या प्रयत्नांमुळेच देशात अन्नसाठ्याची कोणतीही कमतरता नाही. यंदा देशातलं अन्नधान्याचं अंदाजित उत्पादन ३७ कोटी ६० लाख टनांपेक्षा जास्त असून हा आकडा गेल्यावर्षीच्या तुलनेत ५ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांनी जास्त असल्याचं चौहान यावेळी म्हणाले.

दोन दिवस होणाऱ्या या परिषदेत कृषि आणि संबंधित विषयावर व्यापक चर्चा होणार असून, राज्यांमधील भागीदारी आणि हवामान बदलाच्या आव्हानाच्या पार्श्वभूमीवर आगामी खरीप हंगामासाठी धोरणात्मक कृती आराखडा तयार करण हा या परिषदेमागचा उद्देश आहे. या परिषदेत कृषि उत्पादन वाढवणे, लहरी हवामान आणि बदलत्या पावसाच्या पॅटर्न नुसार पीक लागवड, सेंद्रिय शेती, कृषि क्षेत्रासाठी विविध डिजिटल उपकरणे आणि ए आयचा वापर, पिकांचे दुबार आणि तिबार उत्पादन आदि विषयांवर चर्चा होणार आहे.

**<><><><><>**

देशभरात आज ईद अल-अधा-अर्थात बकरी ईद भक्तिभावाने साजरी होत आहे. यानिमित्त विशेष नमाज आणि प्रवचनांचं आयोजन ठिकठिकाणी करण्यात आलं आहे. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी ईद अल अधा निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण भक्ती, त्याग आणि समर्पणाचं प्रतीक असून तो सर्वांना मानवतेची सेवा करण्याची प्रेरणा देतो. या निमित्ताने नागरिकांनी समाजात प्रेम आणि बंधुभाव वाढवण्यासाठी दृढ संकल्प करावा असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. हा पवित्र सण सर्वांच्या जीवनात शांती, आनंद आणि सद्भावना घेऊन येवो अशा शब्दात उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही ईदनिमित्त समाजात बंधुभाव आणि सलोखा वृद्धिंगत होवो, सर्वांना यश आणि आरोग्य प्राप्त होवो अशी शुभकामना व्यक्त केली आहे.

<><><><><>

बकरी ईदमुळे आज नियोजित असलेल्या पदवीपूर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या सी यू ई टी यूजी अर्थात सर्वसाधारण विद्यापीठ प्रवेश परीक्षेचं सुधारित वेळापत्रक आणि प्रवेशपत्रं राष्ट्रीय चाचणी संस्थेने प्रसिद्ध केली आहेत. या परीक्षा आता ३१ मे, ६ आणि ७ जून रोजी घेण्यात येतील. ३१ मे रोजी होणाऱ्या परीक्षेसाठीची प्रवेशपत्रं प्रसिद्ध करण्यात आली असून ती cuet.nta.nic.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील, अशी माहिती संस्थेने दिली आहे. उर्वरित परीक्षांसाठीची प्रवेशपत्रं लवकरच प्रसिद्ध केली जातील. विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळ नियमितपणे पाहून अद्ययावत माहिती मिळवत राहण्याचाचं आवाहन संस्थेने केलं आहे.

<><><><><>

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. सावरकर यांचं शौर्य आणि राष्ट्रभक्ती कायम लोकांना प्रेरणा देत राहील, तसंच त्यांची बुद्धिमत्ता आणि समाजसुधारणेवरील त्यांचा भर हे देखील विशेष उल्लेखनीय, असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदरांजली वाहताना म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देखील स्वातंत्र्यवीर सावरकरांचं स्मरण केलं आहे.

<><><><><>

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी पदाचा राजीनामा देण्याचा निर्णय आज जाहीर केला. सिद्धरामय्या यांनी आज बेंगळुरूतल्या निवासस्थानी मंत्रिमंडळ सदस्यांची बैठक बोलावली होती. त्यावेळी त्यांनी हा निर्णय जाहीर केल्याचं कर्नाटकचे संसदीय कामकाज मंत्री एच के पाटील यांनी बैठकीतून बाहेर पडताना वार्ताहरांना सांगितलं.

सिद्धरामय्या आज दुपारी ३ वाजता राज्यपालांकडे राजीनामा सुपूर्द करतील, आणि डी के शिवकुमार नवे मुख्यमंत्री असतील असंही ते म्हणाले. आजच्या बैठकीला शिवकुमारही उपस्थित होते.

<><><><><>

भारतीय जनता पार्टीने ४ प्रदेशाध्यक्ष पदाच्या नवीन नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. दिल्लीच्या प्रदेशाध्यक्षपदी हर्ष मल्होत्रा यांची तर हरियाणा च्या प्रदेशाध्यक्षपदी डॉ अर्चना गुप्ता यांची नेमणूक झाली आहे. पंजाबमधे सरदार केवलसिंग ढिल्लों यांची आणि त्रिपुरामधे आमदार अभिषेक देबरॉय यांची नेमणूक पक्षाध्यक्ष नितीन नवीन यांनी केली आहे.

<><><><><>

अमेरिकेने इराणच्या लष्करी तळावर हल्ला केल्यानंतर आज कच्च्या तेलाच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. ब्रेंट क्रूड ऑईलचे दर पावणे चार टक्क्यांनी वाढून ९७ डॉलर ८३ सेंट्स प्रति बॅरल इतके झाले आहेत, तर अमेरिकेतल्या कच्च्या तेलाचे दर ४ टक्क्यानी वाढून ९२ डॉलर २२ सेंट्स प्रति बॅरलपर्यंत पोहचले आहेत. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मालवाहतूक सुरळित सुरू होईल या अपेक्षेने या आठवड्यात तेलाच्या किमती कमी झाल्या होत्या, मात्र अमेरिकेच्या हल्ल्यानंतर यात पुन्हा एकदा वाढ झाली आहे.

<><><><><>

भारत आणि चीन यांच्यात सीमाप्रश्नाबाबत शिष्टमंडळ स्तरावर ३५ वी बैठक काल बिजिंग इथं झाली. शांतता आणि स्थैर्य स्थापन करण्याच्या प्रक्रियेच्या प्रगतीबाबत दोन्ही देशांनी समाधान व्यक्त केलं. भारताच्या शिष्टमंडळाचं नेतृत्व संयुक्त सचिव सुजित घोष आणि चीनच्या शिष्टमंडळाचं नेतृत्व चीनच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या सीमा आणि सागरी व्यवहार विभागाच्या महासंचालक हो यांकी यांनी केलं.

<><><><><>

कुवेतवर होणाऱ्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्याला कुवेतच्या सुरक्षा दलाकडून चोख प्रत्युत्तर दिलं जात असल्याचं कुवेतच्या लष्कराने म्हटलं आहे. नागरिकांना सूचनांचं पालन करण्याच्या सूचनाही लष्करानं दिल्या आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी सकाळी ११ वाजता 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा १३४ वा भाग असून त्याचं थेट प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, एआयआर न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एअर मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे AIR

न्यूज, डीडी न्यूज तसंच प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम थेट प्रक्षेपित होईल.

**<><><><><>**

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी आज चमकदार कामगिरी केली. महिला एकेरी प्रकारात पी. व्ही सिंधूने जपानच्या रिको गुंजी हिचा २१-९, २१-१२ असा सरळ गेममध्ये पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. या फेरीत तिचा सामना दक्षिण कोरियाच्या ॲन से यंग हिच्याशी होईल.

पुरुष एकेरी प्रकारात थायलंडच्या खेळाडूने दुखापतीमुळे सामन्यातून माघार घेतल्यानं भारताच्या लक्ष्य सेननेही उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. पुरुष दुहेरी प्रकारात सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनेही मलेशियाच्या जोडीचा पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली.

**//<><><><><>//**